ePaper

## ठाकरे बंधूंची सभा होताच शिवसेना शिंदे गटात घडामोडींना वेग

| वर्ष - 8 | अंक - 327 | UDYAM-MH-26-0158827 |

तेतीर्थांचे माहेर

आषाढी एकादशी निमित्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा!

# महाईन्यूज™

अबीर गुलाल उधळीत रंग।
नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग ॥

www.mahaenews.com | रविवार, दि. 6 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### जाहला विठूनामाचा गजर देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरात दहा लाखापेक्षा जास्त भाविक लोटले : वैष्णवांची मांदियाळी

# अवघी दुमदुमली पंढरी!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विठुरायाची महापूजा, राज्यातील जनतेला सुख-समृद्धी, आरोग्य देण्याबद्दल माऊलीला साकडे!



| पंढरपूर | प्रतिनिधी | महाईन्यूज

**देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरात वैष्णवांची मांदियाळी जमली असून संपूर्ण देशातून दहा लाखापेक्षा जास्त भाविक लोटले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहाटे विठुरायाची सपत्नीक पूजा केली. महाराष्ट्रातील जनतेला सुख-समृद्धी, आरोग्य लाभो अशी मनोभावे प्रार्थना करून त्यांनी विठुरायाला साकडे घातले.**

संसार पंढरी आम्ही वारकरी |
अगा पांडुरंगा सुखी ठेव सारी ||
माया, ममतेची वाहे चंद्रभागा |
लाटातूनी गाई तुक्याच्या अभंगा ||

पंढरपूर नगरी सजली सगळी..

पंढरपूर नगरीत आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर भक्तिरसाचं मोठं उधाण आलं असून, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून दहा लाखापेक्षा जास्त वारकरी श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरीत दाखल झाले आहेत. सावळ्या विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी उभी असलेली रांग अंतापूरच्या पुढे पाच किलोमीटरपर्यंत पसरलेली आहे. संपूर्ण पंढरीतील वातावरण विठूमय झाले असून मृदंग टाळ आणि अखंडपणे विठुराया, ज्ञानेश्वर माऊली आणि तुकोबाचा जयघोष सुरू आहे.

### भक्तांच्या लाटाच लाटा, उसळला महासागर

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत शनिवारी सायंकाळी पोहोचल्या. राज्यभरातून आलेल्या विविध दिंड्याही दिवसभर पंढरीत प्रवेश करत होत्या. भक्तांच्या लाटाच लाटा उसळत आहेत.

### दर्शन रांगेत लाखो भाविक

दर्शनासाठी उभी असलेली भाविकांची रांग अनेक तास चालत असून, पदस्पर्श दर्शनासाठी किमान सात ते आठ तासांचा कालावधी लागत आहे. विठोबाच्या भेटीसाठी आलेल्या भक्तांची ही न थकणारी श्रद्धा पाहून पंढरीतील वातावरण भक्तीमय झाले आहे. यंदा मंदिर समितीने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत जुन्या पत्राशेडऐवजी भव्य आणि जलरोधक मंडप उभारला आहे. या मंडपात पाणी, लाईट, थंडावा देणाऱ्या कुलरची सोय करून वारकऱ्यांसाठी निवासाची सुसज्ज व्यवस्था करण्यात आली आहे. इतर सुविधा देखील मुबलक प्रमाणात उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

### पालख्या पोहोचल्या, प्रशासनाची कसोटी

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालख्या शनिवारी पंढरीत दाखल झाल्या असून, त्यांच्यासोबत असंख्य इतर संतांच्या पालख्या आणि हजारो दिंड्याही पोहोचले आहेत

### पंढरी समीपचा आनंद!

ज्ञानबा, तुकोबाच्या गगनभेदी जयघोषाने पंढरीचा परिसर दुमदुमून गेला आहे. टाळ-मृदंगाचा गजर.. वर दाटून आलेले ढग.. अधून मधून पावसाची शिंपण..पदस्पर्शी चिखलात देहभान विसरून नाचणारे वारकरी, अशा भक्तिरसात ओथंबलेल्या वातावरणात पंढरीतील वातावरण अवर्णनीय असे बनले आहे.

### कानडा राजा पंढरीचा..

महाराष्ट्रातून, सर्व कानाकोपऱ्यातून आलेली पंढरीची वारी शनिवारी रात्री पंढरपुरात विसावली. दहा लाखापेक्षा जास्त भाविक लोटल्याचा अंदाज असून कोणाचीही गैरसोय होणार नाही, अशी दक्षता प्रशासनाने घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहाटे सपत्नीक विठुरायाची महापूजा केली. महाराष्ट्रातील जनतेला, बळीराजा, महिला, युवक आणि गोरगरिबांना सुख-समृद्धी आणि समाधान लाभो, त्याचप्रमाणे समाधानकारक पाऊस पडो, असे साकडे मुख्यमंत्र्यांनी विठुरायाचा घातले !

# ‘पुण्यात शास्त्रीय संगीत-नृत्य केंद्र’ पाहिजे!

## तरुण पिढीने देशासाठी योगदान देणे ही काळाजी गरज

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘सरकारच्या विविध शिष्यवृत्ती योजनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी पाठवले जाते. तेथे उच्च शिक्षण घेऊन त्यांनी देशासाठी योगदान द्यावे, अशी अपेक्षा असते. मात्र, शिष्यवृत्ती घेऊन परदेशात शिक्षणासाठी गेलेले ९० टक्के तरुण परत येत नाहीत,’ अशी खंत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली.**



चिंतामणी ज्ञानपीठ आणि अप्पा रेणुसे मित्र परिवाराच्या वतीने गुरुजन गौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी पवार बोलत होते. ज्येष्ठ उद्योजक अरुण फिरोदिया, ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर, ज्येष्ठ नृत्य कलाकार शमा भाटे यांना पवार यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. माजी महापौर अंकुश काकडे, दीपक मानकर, आयोजक अप्पा रेणुसे, विजय जगताप, अभय मांढरे, मोनिका मोहोळ आदी या वेळी उपस्थित होते.पवार म्हणाले, ‘विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्था (सारथी), डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) आणि महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) या संस्थांच्या माध्यमातून शिष्यवृत्तीद्वारे परदेशात पाठवले जाते. मात्र, ९० टक्क्यांहून अधिक तरुण तेथेच नोकरी, व्यवसाय, उद्योग करत आहेत, असे या संस्थांनी केलेल्या सर्वेक्षणातून निदर्शनास आले आहे. ही बाब खेदजनक असून, तरुण पिढीने देशासाठी योगदान देणे ही काळाजी गरज आहे.’ज्येष्ठ उद्योजक फिरोदिया यांचे उदाहरण देऊन पवार म्हणाले, ‘आयआयटी मुंबई आणि अमेरिकेतील ‘एमआयटी’ या नामांकित संस्थांमध्ये शिक्षण घेऊन ते देशात परत आले. स्वतःचे ज्ञान, कौशल्य आणि दूरदृष्टीद्वारे त्यांनी देशाच्या प्रगतीसाठी झोकून दिले. ही बाब तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.’‘गेल्या काही दिवसांत युद्धाचे स्वरूप बदलले आहे. शस्त्रांऐवजी जैवतंत्रज्ञान, सायबर आणि नवीन तंत्रज्ञानावर आधारित युद्ध होत आहेत. देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने सेंद्रिय शेती, भूगर्भशास्त्र, इलेक्ट्रॉनिक, जिओ थर्मल एनर्जी आणि तंत्रज्ञान हे विषय महत्त्वाचे झाले आहेत. त्यामुळे तरुण पिढीने या विषयांचे ज्ञान अवगत करावे,’ असे आवाहन अरुण फिरोदिया यांनी केले.‘पुण्यात देशपातळीवरील शास्त्रीय संगीत-नृत्य केंद्र झाले पाहिजे,’ अशी अपेक्षा शमा भाटे यांनी भाषणात व्यक्त केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, ‘देशातील सर्वांत मोठे शास्त्रीय संगीत-नृत्य केंद्र पुण्यात उभारले जाईल. त्यासाठी जिल्हा नियोजन समिती, महापालिका किंवा राज्य शासनाकडून मदत देण्यात येईल,’ असे आश्वासन दिले.चिंतामणी ज्ञानपीठ आणि अप्पा रेणुसे मित्र परिवाराच्या वतीने शनिवारी गणेश कला क्रीडा मंच येथे गुरुजन गौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी पवार बोलत होते. ज्येष्ठ उद्योजक अरुण फिरोदिया, ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर, ज्येष्ठ नृत्य कलाकार शमा भाटे यांना पवार यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### ‘तंत्रज्ञान शिक्षण महत्त्वाचे’

माजी महापौर अंकुश काकडे, दीपक मानकर, आयोजक अप्पा रेणुसे, विजय जगताप, अभय मांढरे, मोनिका मोहोळ आदी या वेळी उपस्थित होते.पवार म्हणाले, ‘विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्था (सारथी), डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) आणि महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) या संस्थांच्या माध्यमातून शिष्यवृत्तीद्वारे परदेशात पाठवले जाते. मात्र, ९० टक्क्यांहून अधिक तरुण तेथेच नोकरी, व्यवसाय, उद्योग करत आहेत, असे या संस्थांनी केलेल्या सर्वेक्षणातून निदर्शनास आले आहे. ही बाब खेदजनक असून, तरुण पिढीने देशासाठी योगदान देणे ही काळाजी गरज आहे.

# वीज आयोगाच्या निकालाने संकट!

## राज्य सरकार मात्र, खोडा घालण्याचे काम करत आहे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने नुकत्याच दिलेल्या नव्या आदेशामुळे राज्यातील औद्योगिक क्षेत्रासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले असून, सौरऊर्जा क्षेत्रावरही त्याचा प्रतिकूल परिणाम होणार आहे,’ असे नमूद करून, ऑल इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशनने आयोगाच्या निर्णयावर शनिवारी तीव्र नाराजी व्यक्त केली.**



पूर्वीच्या दरकपातीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची मागणी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. एकीकडे केंद्र सरकार हरित ऊर्जेला प्राधान्य देत असताना राज्य सरकार मात्र, त्यात खोडा घालण्याचे काम करत आहे. त्यामुळे राज्य विकासात मागे पडेल, असा आरोप असोसिएशनने केला आहे. या प्रकरणामध्ये हस्तक्षेप करून राज्यातील उद्योग, व्यवसाय आणि ग्राहकांच्या हिताला प्राधान्य द्यावे, अशी मागणी मुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे, असे असोसिएशनचे जिल्हा संचालक विवेक सुतार आणि प्रादेशिक संचालक संतोष सुराणा यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.राज्य वीज नियामक आयोगाने १ फेब्रुवारी रोजी महावितरणच्या याचिकेवर आक्षेप मागवले. त्यानंतर आगामी पाच वर्षांसाठी घरगुती, औद्योगिक आणि व्यावसायिक अशा सर्व प्रकारच्या ग्राहकांच्या वीज दरात कपात करण्याचा आदेश आयोगाने दिला. या निर्णयावर महावितरणने न्यायालयात धाव घेतली. त्या आदेशाच्या अंमलबजावणीस स्थगिती देण्यात आली. आयोगाने नंतर सुधारित याचिकेतील मजकुराचा आढावा न घेताच जुन्या आदेशाला स्थगिती दिली. त्यानंतर २५ जून रोजी आयोगाने कोणाशीही सल्लामसलत न करता नव्याने आदेश दिले. त्यात

### रात्री सुरू असणारे उद्योग संकटात

या सर्व पार्श्वभूमीवर आयोगाने आपल्या निर्णयाचा पुनर्विचार करावा अन्यथा आंदोलनाचा निर्णय घ्यावा लागेल,’ असा इशारा असोसिएशनने दिला आहे. ‘महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने नुकत्याच दिलेल्या नव्या आदेशामुळे राज्यातील औद्योगिक क्षेत्रासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले असून, सौरऊर्जा क्षेत्रावरही त्याचा प्रतिकूल परिणाम होणार आहे.

उद्योगांना वीजदर वाढ प्रस्तावित केली, याकडे सुतार यांनी लक्ष वेधले.‘आयोगाच्या नव्या आदेशाचा राज्यातील औद्योगिक क्षेत्रावर मोठा परिणाम होणार आहे.

१० किलोवॉटपेक्षा जास्त क्षमतेच्या सौर प्रकल्पांसाठी नेट मीटरिंग फायद्यामध्ये घट झाल्यामुळे उद्योगांना महागडी वीज खरेदी करावी लागणार आहे. त्यामुळे सौरऊर्जा उद्योग संकटात सापडणार असून, हे उद्योगधंदे परराज्यांत जाण्याची भीती आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आयोगाने मागील आदेशाची अंमलबजावणी करावी,’ अशी मागणी सुतार यांनी केली.‘सायंकाळी आणि रात्री सुरू राहणाऱ्या हॉटेलसह अन्य व्यवसायांना वीज दरवाढीचा मोठा फटका बसणार आहे. सौरऊर्जा प्रकल्पातील अतिरिक्त वीज छोट्या उद्योगांना सायंकाळी सहा ते रात्री दहा या वेळेत वापरण्याची मुभा होती. आता नव्या नियमावलीत सकाळी आठ ते सायंकाळी पाच या वेळेत वापरण्याची अट आहे. परिणामी, आणखी विजेचा भुर्दंड सहन करावा लागणार आहे.

## आरटीओचे दुर्लक्ष, खासगी बसचे भाडे दामदुपट्ट

# पिंपरी चिंचवडमधील प्रवाशांची 'सरकारमान्य' लूट

## बसच्या मनमानी भाड्यामुळे प्रवाशांच्या खिशाला चाट

| पिंपरी-चिंचवड |
महाईन्यूज | प्रतिनिधी |

**सुट्ट्यांचा हंगाम सुरु झाला की, नागरिकांना मूळ गावी जाण्याचे किंवा नातेवाईकांना भेटण्यासाठी अथवा पर्यटनाला जाण्याचे वेध लागतात. ह्या काळात रेल्वेला असलेली गर्दी, प्रतीक्षा यादी बघता सामान्य नागरिक हा खासगी प्रवासी बसद्वारे प्रवासाला प्राधान्य देतो. मात्र ,नेमकी प्रवाश्यांची ही गरज ओळखून खासगी बस मालकांनी प्रचंड भाडेवाढ केली आहे. यातून ग्राहकांची पिळवणूक आणि लूटमार सुरू आहे.**



दरम्यान, जास्त भाडे आकारणी करणाऱ्या बसचालक, मालक आणि कंपन्यांविरुद्ध कारवाई करण्यात आरटीओ आखडता हात घेत असल्याने प्रवाशांची चक्क 'सरकारमान्य' लूट सुरू आहे.पिंपरी-चिंचवड ही कामगार, कष्टकऱ्यांची नगरी म्हणून ओळखली जाते. राज्याच्या तसेच परराज्यातील कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने चाकरमानी उद्योगनगरीत वास्तव्यास आहेत. दिवाळी तसेच उन्हाळ्यात मुलांना शाळेला सुटी लागत असल्याने अनेक जण कुटूंबासह गावी जाण्यास प्राधान्य देतात. शहरातून मूळगावी जाणाऱ्या प्रवाशांमध्ये विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रवाशांची संख्या अधिक आहे. मुख्यत्वे दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीच्या काळात ही संख्या खूप मोठी असते. उन्हाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर रेल्वेचे बुकिंग फुल्ल झालेले आहे. एसटी महामंडळाकडेही प्रवाशांची गर्दी असते. त्यामुळे प्रवाशांना खासगी ट्रॅव्हल्स हाच पर्याय शिल्लक असतो.

मात्र, याच संधीचा खासगी प्रवासी वाहतुक करणारे गैरफायदा उठवतात. शहरातून दररोज सुमारे पाचशेहून अधिक खासगी बस राज्याच्या विविध भागात जातात. या व्यतिरिक्त मुंबईहूनही मोठ्या संख्येने खासगी बस पुण्यातून पुढे मार्गस्थ होतात. ट्रॅव्हल्स चालकांकडून या काळात मोठ्या प्रमाणात तिकीट दर वाढवले जातात. काही ठिकाणी तिकीट दरामध्ये दुप्पट, तिप्पट वाढ केली जाते. ही वाढ प्रवाशांच्या खिशाला चांगलाच चाट लावत आहे. प्रवाशांची संख्या वाढण्याच्या काळात बसचे भाडे वाढविण्याचे प्रकार होतात. त्यामुळे प्रवाशांना मोठा भुर्दंड बसत आहे. त्यामुळे सुटीच्या काळात गावी जावे की नाही असा प्रश्न सर्वसामान्यांना भेडसावत आहे. उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत खासगी प्रवासी बसची वाहतूक पथकामार्फत तपासणी करावी. तिकीट बुकिंग काउंटरवरदेखील जाऊन तपासणी व्हावी. गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जावी. भाडेवाढीमुळे प्रवाशांना विनाकारण भुर्दंड सहन करावा लागत आहे. या त्रासापासून सुटका होऊन नागरिकांची होणारी लूटमार थांबवावी, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.

### सरकारच्या कमाल दराकडे दुर्लक्ष

खासगी प्रवासी बसला एसटी बसच्या प्रतिकिलोमीटर भाडेदाच्या दीडपट भाडे आकारता येते. याबाबतचे कमाल भाडे सरकारने निश्चित केले आहे. हे दीडपट दर केवळ उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत असतात. काही खासगी प्रवासी बस सणासुदीच्या व गर्दीच्या हंगामामध्ये प्रवाशांकडून मनमानी भाडे आकारतात. मात्र, जास्त भाडे आकारणाऱ्या खासगी बसवर आरटीओ आणि वाहतूक पोलिसांकडून कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे खासगी आराम बस चालकांच्या मनमानीत वाढ होत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बसमालकांवर आरटीओने कारवाई करणे गरजेचे आहे.

## बचत गटांच्या महिलांकडून मालमत्ता कर बिलांचे वाटप!

## मालमत्ताधारकांनी सहकार्य करावे : पिंपरी-चिंचवड पालिका प्रशासनाचे आवाहन

| पिंपरी-चिंचवड |
महाईन्यूज | प्रतिनिधी |

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने २०२५-२६ या आर्थिक वर्षातही महिला बचत गटाच्या मार्फत बिलांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. तरी बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.**





पिंपरी-चिंचवड शहरात ६ लाख १५ हजार ८६३ नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यानुसार सर्वच बिलांची छपाई होऊन बिले वाटप करण्यास सुरुवात झाली आहे. महिला बचत गटातील महिलांच्या माध्यमातून मिळकतकर बिले घरोघरी पोहोचवण्याची जबाबदारी महानगरपालिकेने महिला आर्थिक विकास महामंडळावर सोपवली आहे. बिल वाटप करण्यात येणाऱ्या महिलांना महानगरपालिकेच्या वतीने ओळखपत्र ही देण्यात आले आहे. ३१ मे पर्यंत सर्व बिलांचे वितरण करण्याचे नियोजन महानगरपालिकेने केले आहे. तरी नागरिकांनीही बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. मालमत्ता कर भरण्याची ऑनलाइन सुविधा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आर्थिक वर्ष २०२५-२६ ची मालमत्ता कर बिले ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आली असून, करदात्यांना त्यांच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तांची बिले www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता व भरता येतील. तसेच मालमत्ता कर बिले ३० जूनपर्यंत ऑनलाईन पद्धतीने बिले भरल्यास सामान्य करावर १० टक्के सवलत मिळणार आहे.

> " बचत गटांच्या महिलांमार्फत मालमत्ता कर बिलांचे वाटप सुरू झाले आहे. यामुळे बचत गटांच्या महिलांच्या आर्थिक सक्षमतेस बळकटी मिळणार आहे. तसेच नागरिकांपर्यंत वेळेवर बिले पोहोचवण्याच्या उद्देशालाही चालना मिळणार आहे. नागरिकांनी देखील बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे.
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> " पिंपरी चिंचवड महानगरपालिका मालमत्ता कर विभागाचे बिल वाटप महिला बचत गटांच्या महिलांमार्फत करण्यात येत आहे. ३० जून २०२५ पर्यंत कर भरल्यास मालमत्ताधारकांना विविध सवलतींचा लाभ घेता येणार आहे. तरी जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी लवकरात लवकर कर भरून सवलतींचा लाभ घ्यावा.
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने »



### आपली सुखदु:खे श्रीरामाला सांगा

तुम्ही सर्वजण छान सेवा करता आहात ह्याबद्दल शंका नाही. अशीच सेवा अखंड चालू ठेवा, त्यातच कल्याण आहे. त्यानेच आपण तरून जाऊ. जरी कुणी काहीही सांगितले, ‘ ह्यात काय आहे, त्यात काय आहे, ह्याने काय होणार आहे, ’ असे म्हटले, तरी तुम्ही तिकडे लक्ष देऊ नका. परमेश्वराची सेवा वाढवावी तेवढी थोडीच आहे. तो फार मोठा आहे, अमर्याद आहे. त्याला पहायला तशीच सेवाही फार मोठी करायला पाहिजे. त्याला पाहण्यासाठी तशी मोठी शक्तीही आपल्याला लागेल. अर्जुनाला श्रीकृष्ण परमात्म्याने दिव्य दृष्टी देऊन दर्शन घडविले. ती दिव्य दृष्टी आपल्याजवळ नाही, पण ती मिळविण्याची शक्ती आपल्याजवळ आहे. भक्तीची प्रगती ही खरी शक्ती; आणि त्याकरिता अखंड नामस्मरण हेच खरे साधन. श्रीरामप्रभू आपल्या घरातला कुणीतरी आहे याबद्दल खात्री बाळगा. त्याला तुम्ही आपली सुखदु:खे सांगा. दिवसाकाठी एकदा तरी रामापुढे उभे राहून त्याला अनन्यभावाने शरण जा; दिवस आनंदात जाईल आणि तुमचे दु:ख दूर होईल. आपले ज्ञान, शक्ती, वैभव, सत्ता त्याच्यापुढे काहीच नाहीत. तेव्हा या सर्वांचा विसर पाडून, त्याला शरण जा, आणि त्याच्याजवळ प्रेम मागा. “ देवा ! आम्ही जे तुझे दर्शन घेतो ते सर्व बाह्य स्वरूपाचे; तुझे आम्हाला खरे दर्शन घडव. आम्ही अवगुणसंपन्न असू, तुझे दर्शन व्हावे एवढी सेवा आमच्याजवळ नाही, परंतु तू आता आम्हाला क्षमा कर. यापुढे, देवा, कितीही संकटे येवोत, आमच्या प्रारब्धाचे भोग आम्ही तुझ्या नामात आनंदाने भोगू. जे काही व्हायचे असेल ते होऊ दे, आमचे समाधान टिकून तुझ्या नामात आमचे प्रेम राहील एवढी तुझी कृपा असू दे. ” खरोखर, परमेश्वर भक्ताचे मन पाहतो, त्याचा भाव पाहतो; एरव्ही तो त्याच्याजवळच असतो. जो श्रद्धेने परमेश्वराचे चिंतन करतो त्याला, परमेश्वरजवळ असून आपल्याला तो मदत करायला सिद्ध आहे याची खात्रीच असते. आपल्याला दोन मार्ग आहेत; एक श्रद्धेचा, आणि दुसरा अनुभवाचा. एका गावी पायवाटेने गेले तर फक्त तीन मैलांचे अंतर, आणि मोटरच्या रस्त्याने गेले तर दहाबारा मैलांचे अंतर. श्रद्धा ही त्या पायवाटेसारखी आहे. तिने चालले तर अंतर कमी पडेल. मोटारीचा मार्ग म्हणजे अनुभवाचा मार्ग. मोटार कुठे रस्त्यात बिघडली, किंवा वाटेत कुठे अडथळा आला, की प्रगती थांबते; त्याप्रमाणे अनुभवात काही चुकले की प्रगती खुंटते. तेव्हा शक्यतो आपण श्रद्धेचा मार्ग पत्करावा. सद्‌गुरूच्या शब्दावर विश्वास ठेवून श्रद्धेने आणि प्रेमाने नाम घ्यावे.

बोधवचन:- भगवंताचे नाम सिद्ध करून देणे हाच संतांचा जगावर सर्वांत मोठा उपकार होय.



‘स्टेट’मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# मराठा तितुका मेळवावा, मराठी माणूस खेळवावा!



**मराठी भाषेचा मुद्दा, हिंदी सक्ती वरून ‘महायुती’ बॅकफूटवर आणि या मुद्द्यावरून उद्धव तसेच राज ठाकरे यांनी घेतलेला विजयी मेळावा..राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे! आपल्या भाषणामध्ये ठाकरे बंधूंनी हिंदी भाषा सत्तेवर जोरदार टीका केली आणि शेवटी ‘एकी’ चा नारा दिला. या पुढील आमची वाटचाल एकत्रपणे होईल, अशी ग्वाही दोघांनी दिली. त्यामुळे, सध्या ठाकरे सेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या कार्यकर्त्यांमध्ये मात्र चैतन्याचे वातावरण आहे हे मानलेच पाहिजे.**

### फडणवीस यांचा ‘प्लॅन’ काय ?

दोन्ही ठाकरे बंधू एकत्र, आता फडणवीसांचाही प्लॅन ठरला, असे भाजपाचे सर्व नेते म्हणत असून ते अस्त्र बाहेर काढणार ? असा एक सूचक सुगावा भाजपच्या नेत्याने देऊन टाकला आहे. तो काय असेल याबाबत मात्र कमालीची उत्सुकता आहे.

### फडणवीस विठुरायाच्या चरणी!

एकीकडे ठाकरे बंधूंचा मेळावा सुरू असताना दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र पंढरपूर गाठले असून पंढरीच्या वारीतील वारकऱ्यांसोबत भक्तिमार्गावर पायी वाटचाल सुरू ठेवली आहे. त्या ठिकाणी ही काही पत्रकारांनी त्यांना गाठलेच. त्यांनी राज ठाकरे यांचे कौतुक केले असून उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. दोन्ही भावांना एकत्र आणण्याचे काम फडणवीस यांनी केल्याचा उल्लेख राज ठाकरे यांनी केल्यामुळे त्यांचे फडणवीस यांनी आभार मानले आहेत. मुंबईतला माणूस आमच्याच पाठीशी आहे, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### मेळाव्यात जल्लोष आणि उत्साह..

ठाकरे बंधूंच्या मेळाव्याच्या निमित्ताने मुंबईत ऐतिहासिक दृश्य पाहायला मिळाले. मेळाव्याला आलेल्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह आणि जल्लोष होता. राज ठाकरे आणि ठाकरे उद्धव ठाकरे हे तब्बल १९-२० वर्षानंतर एकाच मंचावर पाहायला मिळाले. विजयी मेळाव्याच्या निमित्ताने या दोन्ही नेत्यांनी जोरदार भाषण करून भाजपा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली. राज ठाकरे यांनी सुरुवातीला सांगून टाकले, की  शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना जे जमले नाही, ते फडणवीस यांनी करून दाखवले, आम्हा भावांना त्यांनी एकत्र आणले. राज ठाकरेंच्या याच विधानावर फडणवीसांनी प्रतिक्रिया दिली आहे. तसेच राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मराठीचा मुद्दा लावून धरलेला असताना फडणवीस यांनीही हिंदुत्त्वाचा उल्लेख करत मुंबई जिंकण्यासाठीच्या रणनीतीची एक झलक दाखवून दिली आहे.

### फडणवीसांचा उद्धव यांना टोला..

फडणवीस म्हणाले, की मी राज ठाकरे यांचे आभार मानतो, की त्यांनी ठाकरे बंधू एकत्र येण्याचं श्रेय मला दिले. त्यामुळे वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे आशीर्वाद हे मलाच मिळतील. तसेच मला सांगण्यात आले होते की विजयी मेळावा होणार आहे. पण, त्या ठिकाणी ‘रुदाली’ चेही भाषण झाले, असा टोलाही त्यांनी लगावला. मराठी भाषेबद्दल न बोलता. आमचे सरकार गेले, आमचे सरकार पाडले, यापुढील निवडणुकांमध्ये आम्हालाच निवडून द्या, असे ऐकायला मिळाले. हा मराठी चा विषयोत्सव नव्हता, ही ‘रुदाली’ होती, असा टोलाही फडणवीसांनी उद्धव ठाकरेंना लगावला. त्यामुळे ठाकरे बंधूंचे वार आणि फडणवीस यांचे पलटवार यामुळे मेळावा गाजला.

### मुख्य रोष उद्धव ठाकरेंवर..

फडणवीस यांचा मुख्य रोष उद्धव ठाकरे यांच्यावर होता. त्यांच्याच काळात मुंबईतील मराठी माणूस हद्दपार झाला, असा आरोप त्यांनी केला. मुंबई महानगरपालिकेची निवडणूक आणि उद्धव ठाकरे यांच्या पक्षाची पालिकेवर असलेली सत्ता यांचा उल्लेख करत मुंबईकरांचा पाठिंबा आम्हालाच आहे, असा विश्वास व्यक्त केला. गेली २५ वर्षे त्यांच्याकडे मुंबईची महानगरपालिका होती. या २५ वर्षांत ते काहीच करू शकले नाहीत, हा त्यांचा मुख्य आरोप होता.

### मुंबईचा चेहरा मोहरा बदलवला !

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात आम्ही मुंबईचा जो चेहरामोहरा बदलवला, असा उल्लेख करून फडणवीस म्हणाले, की उद्धव ठाकरे यांच्या काळात मुंबईतला मराठी माणूस हद्दपार झाला.आम्ही बीडीडी चाळीतील मराठी माणसाला पत्राचाळीतील तसेच अभ्यूदयनगरच्या मराठी माणसाला हक्काचे मोठे घर त्याच ठिकाणी दिले. याचीच असूया त्यांच्या मनात आहे. जे त्यांच्या हातून घडले नाही ते आम्ही सहज शक्य केले असेही फडणवीस म्हणाले आणि त्यांनी उद्धव यांना डिवचले.

### पुढील निवडणुकीत हिंदुत्त्वाचा मुद्दा?

फडणवीस यांनी सूचित केले, की मतदारांना आणि नागरिकांना सर्व माहीत असते. मुंबईतील मराठी माणूस असो किंवा अमराठी माणूस, हे सगळेच आमच्या सोबत आहेत. आम्ही मराठी आहोत. आम्हाला मराठी भाषेचा अभिमान आहे. त्यासोबतच आम्ही हिंदू आहोत. आम्हाला हिंदुत्त्वाचा अभिमान आहे. आमचे हिंदुत्त्व हे सर्वांना घेऊन चालणारे हिंदुत्त्व आहे, असे म्हणत फडणवीस यांनी महापालिकेच्या निवडणुकीत हिंदुत्त्वाचाही मुद्दा केंद्रस्थानी असेल, याचे संकेत दिले, हे सर्वांच्याच लक्षात आले. घोडा मैदान जवळ आहे.. पुढील सहा महिन्यात मुंबई महानगरपालिकेची निवडणूक होणार असून एकत्र येण्याची इच्छा व्यक्त करणाऱ्या ठाकरे बंधूंची लढत प्रामुख्याने भारतीय जनता पार्टी आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना यांच्यातच आहे. घोडा मैदान अगदी जवळ आहे, पाहू या काय होते ते !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# वादळ आता महाराष्ट्रापर्यंत पोहोचले!

## हिंदी सक्तीविरोधातील एकीचे स्टॅलिन यांनी केलं स्वागत

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राष्ट्रीय शिक्षण धोरणातील त्रिभाषा सूत्राच्या विरोधातील लढ्यात आघाडीची भूमिका घेतलेले तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी हिंदी सक्तीविरोधात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्र येण्याचे स्वागत केले आहे.**



शिवसेनेचे (ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी महाराष्ट्रात त्रिभाषा सूत्राच्या अंमलबजावणीला कडाडून विरोध दर्शवला आहे.या धोरणाच्या अंमलबजावणीसंबंधीचे आदेश राज्य सरकारने मागे घेतल्याचा विजय साजरा करण्यासाठी, शनिवारी त्यांनी 'मराठीचा आवाज' हा मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे २००५ नंतर प्रथमच एकाच व्यासपीठावर एकत्र आले होते. यावेळी उद्धव ठाकरे यांनी, "एकत्र राहण्यासाठीच एकत्र आलो आहोत", असे जाहीर केले. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन हे त्रिभाषा सूत्राच्या विरोधात आघाडीवर आहेत.त्रिभाषा सूत्रांतर्गत,पहिलीपासून विद्यार्थ्यांना त्यांची मातृभाषा आणि किमान एक अन्य भारतीय भाषा यासह तीन भाषा शिकणे बंधनकारक आहे. एम. के. स्टॅलिन यांनी असा दावा केला आहे की, केंद्रातील भाजपाच्या नेतृत्वाखालील सरकार तामिळनाडूमध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या तमिळ आणि इंग्रजी या दोन भाषांच्या जागी त्रिभाषा धोरणाद्वारे हिंदी लादण्याचा प्रयत्न करीत आहे.शनिवारी झालेल्या उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या विजयी मेळाव्यानंतर एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये, स्टॅलिन म्हणाले की, "भाषेच्या हक्कांसाठीचा संघर्ष राज्यांच्या सीमा ओलांडून पुढे गेला आहे आणि तो आता महाराष्ट्रात वादळाप्रमाणे जोर धरत आहे." "हिंदी सक्तीचा पराभव करण्यासाठी द्रविड मुन्नेत्र कळघम आणि तामिळनाडूच्या लोकांनी पिढ्यानपिढ्या केलेला भाषा हक्कांचा संघर्ष आता राज्यांच्या सीमा ओलांडून महाराष्ट्रात निषेधाच्या वादळाप्रमाणे जोर धरत आहे", असे स्टॅलिन यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या प्रभावी वक्तृत्वाचे कौतुक करताना, स्टॅलिन म्हणाले की, "उत्तर प्रदेश आणि राजस्थानमध्ये तिसरी भाषा कोणती असेल आणि प्रगतीशील बिगर हिंदी भाषिक राज्यांमधील लोकांवर हिंदी का लादली जात आहे, या मनसे प्रमुखांच्या प्रश्नांना केंद्राकडे कोणतेही उत्तर नाही."दरम्यान, तामिळनाडू त्यांच्या राज्यात राष्ट्रीय शिक्षण धोरण लागू करत नसल्यामुळे निधी जारी न केल्याबद्दल मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी केंद्र सरकारवर सातत्याने टीका केली आहे. याचबरोबर हिंदी शिकल्याने लोकांना नोकऱ्या मिळतील, असा दावा करणाऱ्यांवरही त्यांनी टीका केली आहेया धोरणाच्या अंमलबजावणीसंबंधीचे आदेश राज्य सरकारने मागे घेतल्याचा विजय साजरा करण्यासाठी, शनिवारी त्यांनी 'मराठीचा आवाज' हा मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे २००५ नंतर प्रथमच एकाच व्यासपीठावर एकत्र आले.

### महाराष्ट्र वादळाप्रमाणे जोर धरत आहे

उद्धव ठाकरे यांनी, "एकत्र राहण्यासाठीच एकत्र आलो आहोत", असे जाहीर केले.तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन हे त्रिभाषा सूत्राच्या विरोधात आघाडीवर आहेत. त्रिभाषा सूत्रांतर्गत, पहिलीपासून विद्यार्थ्यांना त्यांची मातृभाषा आणि किमान एक अन्य भारतीय भाषा यासह तीन भाषा शिकणे बंधनकारक आहे. एम. के. स्टॅलिन यांनी असा दावा केला आहे की, केंद्रातील भाजपाच्या नेतृत्वाखालील सरकार तामिळनाडूमध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या तमिळ आणि इंग्रजी या दोन भाषांच्या जागी त्रिभाषा धोरणाद्वारे हिंदी लादण्याचा प्रयत्न करीत आहे.शनिवारी झालेल्या उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या विजयी मेळाव्यानंतर एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये, स्टॅलिन म्हणाले की, "भाषेच्या हक्कांसाठीचा संघर्ष राज्यांच्या सीमा ओलांडून पुढे गेला आहे. आणि तो आता महाराष्ट्रात वादळाप्रमाणे जोर धरत आहे.

# निवडणुकीत हरणार म्हणून कुटुंब तह!

## ठाकरे बंधूंच्या मेळाव्यानंतर भाजपाची पहिली प्रतिक्रिया

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यात हिंदी भाषेच्या सक्तीच्या मुद्यांवरून मागील काही दिवसांपासून चांगलंच राजकारण तापलं होतं. त्यानंतर अखेर हिंदी भाषा सक्तीचा निर्णय राज्य सरकारने रद्द केला. हा निर्णय राज्य सरकारने रद्द केल्यानंतर जल्लोष करण्यासाठी (ठाकरे) आणि मनसेच्यावतीने आज मुंबईत विजयी मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. मुंबईच्या वरळीतील डोम या ठिकाणी ठाकरे बंधूंचा हा मेळावा पार पडला आहे. उद्धव ठाकरे यांनी आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेना (ठाकरे) आणि मनसेच्या युतीचे संकेत दिले आहेत.**





तसेच उद्धव ठाकरे यांनी या मेळाव्यात बोलताना देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपावर जोरदार टीका केली.आता भारतीय जनता पक्षाकडून पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. भाजपाचे नेते आशिष शेलार यांनी एक्सवर (ट्विटर) एक पोस्ट शेअर करत ठाकरे बंधूंवर टीका केली आहे. तसेच भाषेसाठी नाही ही तर निवडणुकीसाठी जाहीर मनधरणी असल्याचं म्हणत भाजपाला घाबरलेल्या उबाठा सेनेला आता 'भाऊबंदकी' आठवल्याची टीका आशिष शेलार यांनी केली आहे.भाषेसाठी नाही ही तर निवडणुकीसाठी जाहीर मनधरणी!, महापालिका निवडणुका जवळ आल्यामुळे भाजपाला घाबरलेल्या उबाठा सेनेला आता 'भाऊबंदकी' आठवली. ज्या भावाला घराबाहेर काढले त्याची जाहीर मनधरणी करण्यासाठी आजचा वरळीचा कौटुंबिक स्नेह मिलनाचा कार्यक्रम होता", अशी टीका आशिष शेलार यांनी केली आहे.भाषेचे प्रेम वगैरे काही नव्हतेच आणि ते यांच्या लेखी नाहीच! सत्ता मिळवण्यासाठी आणि पुन्हा मुंबईची लुटमार, राज ठाकरे यांच्याशी केलेली हातमिळवणी म्हणजे निवडणुकीत हरणार म्हणून कुटुंब तहात जिंकण्याचा प्रयत्न", असं आशिष शेलार यांनी म्हटलं आहे.

### आशिष शेलार काय म्हणाले?

उद्धव ठाकरे यांनी या मेळाव्यात बोलताना देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपावर जोरदार टीका केली.आता भारतीय जनता पक्षाकडून पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. भाजपाचे नेते आशिष शेलार यांनी एक्सवर (ट्विटर) एक पोस्ट शेअर करत ठाकरे बंधूंवर टीका केली आहे. तसेच भाषेसाठी नाही ही तर निवडणुकीसाठी जाहीर मनधरणी असल्याचं म्हणत भाजपाला घाबरलेल्या उबाठा सेनेला आता 'भाऊबंदकी' आठवल्याची टीका आशिष शेलार यांनी केली आहे.भाषेसाठी नाही ही तर निवडणुकीसाठी जाहीर मनधरणी!, महापालिका निवडणुका जवळ आल्यामुळे भाजपाला घाबरलेल्या उबाठा सेनेला आता 'भाऊबंदकी' आठवली.भाषेचे प्रेम वगैरे काही नव्हतेच आणि ते यांच्या लेखी नाहीच! सत्ता मिळवण्यासाठी आणि पुन्हा मुंबईची लुटमार, राज ठाकरे यांच्याशी केलेली हातमिळवणी म्हणजे निवडणुकीत हरणार म्हणून कुटुंब तहात जिंकण्याचा प्रयत्न", असं आशिष शेलार यांनी म्हटलं आहे.

# प्रवाशांनी विमानातून मारल्या उड्या!

## 18 जखमी; काही मिनिटांपूर्वी मिळाली आगीची सूचना

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**गेल्या महिन्यात अहमदाबादमध्ये झालेल्या विमान अपघातानंतर, विमानांच्या लहान-मोठ्या अपघातांबद्दलच्या बातम्या सातत्याने समोर येत आहेत. अशात, आता स्पेनमधील पाल्मा दे मॅलोर्का विमानतळावर रायनएअरच्या बोईंग ७३७ विमानात आगीचा इशारा देण्यात आल्यानंतर किमान १८ प्रवासी जखमी झाले. शनिवारी मँचेस्टरला जाणारे विमान उड्डाण घेण्याच्या तयारीत असतानाच ही घटना घडली.**



अरब टाईम्सच्या वृत्तानुसार, आपत्कालीन विभागाला परिस्थितीची माहिती मिळताच ते तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. यावेळी विमानतळावरील अग्निशमन दल आणि सिव्हिल गार्डच्या सदस्यांसह प्रादेशिक आपत्कालीन समन्वय केंद्राने चार रुग्णवाहिका घटनास्थळी पाठवल्या होत्या.घटनेदरम्यान, प्रवाशांना आपत्कालीन मार्गाने विमानातून बाहेर काढण्यात आले, तर काही प्रवाशांनी सुरक्षिततेसाठी विमानाच्या पंखावरून थेट जमिनीवर उडी मारली.दरम्यान, या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये काही प्रवासी घाबरून आपत्कालीन मार्गातून विमानातून बाहेर पडताना दिसत आहेत. याचबरोबर, काही प्रवासी आधी विमानाच्या पंखावर चढताना आणि नंतर जमिनीवर उडी मारताना दिसत आहेत. प्रादेशिक आपत्कालीन समन्वय केंद्राच्या प्रवक्त्याने दिलेल्या माहितीनुसार, या घटनेत अठरा प्रवासी जखमी झाले असून सर्वांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, या घटनेला रायनएअर या विमान कंपनीने दुजोरा दिला आहे. कंपनीने एका निवेदनात म्हटले आहे की, "४ जुलै रोजी पाल्माहून मँचेस्टरला जाणाऱ्या विमानाचे उड्डाण, आगीची खोटी सूचना देणारा दिवा चालू झाल्यामुळे थांबवावे लागले. यानंतर विविध उपाययोजना करून प्रवाशांना खाली उतरवून टर्मिनलवर आणण्यात आले.

"गेल्या आठवड्यात, अमेरिकन एअरलाइन्सच्या एका विमानात अशीच एक घटना घडली होती. त्या विमानाच्या एका इंजिनाला हवेत आग लागली होती. १५३ प्रवासी आणि सहा क्रू मेंबर्स असलेल्या या विमानाचे उड्डाणानंतर काही वेळातच लास वेगासमध्ये आपत्कालीन लँडिंग करावे लागले होते.पत्कालीन विभागाला परिस्थितीची माहिती मिळताच ते तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. यावेळी विमानतळावरील अग्निशमन दल आणि सिव्हिल गार्डच्या सदस्यांसह प्रादेशिक आपत्कालीन समन्वय केंद्राने चार रुग्णवाहिका घटनास्थळी पाठवल्या होत्या.घटनेदरम्यान, प्रवाशांना आपत्कालीन मार्गाने विमानातून बाहेर काढण्यात आले, तर काही प्रवाशांनी सुरक्षिततेसाठी विमानाच्या पंखावरून थेट जमिनीवर उडी मारली.दरम्यान, या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये काही प्रवासी घाबरून आपत्कालीन मार्गातून विमानातून बाहेर पडताना दिसत आहेत. याचबरोबर, काही प्रवासी आधी विमानाच्या पंखावर चढताना आणि नंतर जमिनीवर उडी मारताना दिसत आहेत.

### आपत्कालीन लँडिंग करावे लागले

प्रादेशिक आपत्कालीन समन्वय केंद्राच्या प्रवक्त्याने दिलेल्या माहितीनुसार, या घटनेत अठरा प्रवासी जखमी झाले असून सर्वांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.दरम्यान, या घटनेला रायनएअर या विमान कंपनीने दुजोरा दिला आहे. कंपनीने एका निवेदनात म्हटले आहे की, "४ जुलै रोजी पाल्माहून मँचेस्टरला जाणाऱ्या विमानाचे उड्डाण, आगीची खोटी सूचना देणारा दिवा चालू झाल्यामुळे थांबवावे लागले. यानंतर विविध उपाययोजना करून प्रवाशांना खाली उतरवून टर्मिनलवर आणण्यात आले."गेल्या आठवड्यात, अमेरिकन एअरलाइन्सच्या एका विमानात अशीच एक घटना घडली होती. त्या विमानाच्या एका इंजिनाला हवेत आग लागली होती. १५३ प्रवासी आणि सहा क्रू मेंबर्स असलेल्या या विमानाचे उड्डाणानंतर काही वेळातच लास वेगासमध्ये आपत्कालीन लँडिंग करावे लागले होते.

# मोदी हे डोनाल्ड ट्रम्प यांच्यासमोर झुकतील!

## व्यापार करारावरून राहुल यांची पंतप्रधान मोदींवर टीका

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**भारत-अमेरिका द्विपक्षीय व्यापार कराराच्या मुद्द्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासमोर झुकतील अशी टीका काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शनिवारी केली. त्यावर, आम्ही अंतिम मुदतीचा नाही तर आमच्या सामर्थ्याचा विचार करून करार करू अशी प्रतिक्रिया वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांनी व्यक्त केली.**



सरकार अंतिम मुदतीचा विचार करून हा करार करणार नाही, तर राष्ट्रीय हिताचा विचार करेल असे वाणिज्यमंत्री गोयल शुक्रवारी म्हणाले. राहुल यांनी 'एक्स'वर गोयल यांच्या वक्तव्यासंबंधीचे वृत्त प्रसिद्ध करून मोदी यांच्यावर टीका केली. ट्रम्प यांनी भारत-अमेरिका द्विपक्षीय व्यापार करारासाठी ९ जुलै ही अंतिम मुदत निश्चित केली आहे. मात्र, आम्ही राष्ट्रहिताचा विचार करूनच करार करतो. काँग्रेस आणि यूपीए राष्ट्रहिताचा विचार करत नव्हते असे प्रत्युत्तर गोयल यांनी राहुल गांधी यांना दिले. भारत आणि पाकिस्तानदरम्यान आपण शस्त्रविराम घडवून आणला असा दावा ट्रम्प यांनी वारंवार केल्यानंतरही पंतप्रधान मोदी यांनी त्याला उत्तर दिलेले नाही. त्याबद्दल काँग्रेस सातत्याने टीका करत आहे.पीयूष गोयल यांनी कितीही छातीठोकपणे सांगू देत, माझे शब्द लक्षात ठेवा, मोदी ट्रम्प यांनी आखून दिलेल्या मुदतीसमोर लीनपणे झुकतील.

सरकार अंतिम मुदतीचा विचार करून हा करार करणार नाही, तर राष्ट्रीय हिताचा विचार करेल असे वाणिज्यमंत्री गोयल शुक्रवारी म्हणाले. राहुल यांनी 'एक्स'वर गोयल यांच्या वक्तव्यासंबंधीचे वृत्त प्रसिद्ध करून मोदी यांच्यावर टीका केली. ट्रम्प यांनी भारत-अमेरिका द्विपक्षीय व्यापार करारासाठी ९ जुलै ही अंतिम मुदत निश्चित केली आहे. मात्र, आम्ही राष्ट्रहिताचा विचार करूनच करार करतो. काँग्रेस आणि यूपीए राष्ट्रहिताचा विचार करत नव्हते.

### राष्ट्रहितालाचा सर्वोच्च प्राधान्य

असे प्रत्युत्तर गोयल यांनी राहुल गांधी यांना दिले.भारत आणि पाकिस्तानदरम्यान आपण शस्त्रविराम घडवून आणला असा दावा ट्रम्प यांनी वारंवार केल्यानंतरही पंतप्रधान मोदी यांनी त्याला उत्तर दिलेले नाही. त्याबद्दल काँग्रेस सातत्याने टीका करत आहे. पीयूष गोयल यांनी कितीही छातीठोकपणे सांगू देत, माझे शब्द लक्षात ठेवा, मोदी ट्रम्प यांनी आखून दिलेल्या मुदतीसमोर लीनपणे झुकतील.आम्ही मुदतीनुसार वाटाघाटी करत नाही. आम्ही राष्ट्रहित लक्षात घेऊन वाटाघाटी करतो आणि जगभरात आमच्या चर्चांमध्ये राष्ट्रहितालाचा सर्वोच्च प्राधान्य असते.भारत-अमेरिका द्विपक्षीय व्यापार कराराच्या मुद्द्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासमोर झुकतील अशी टीका काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शनिवारी केली.

# आनंदाची अनुभूती : पंढरीची वारी



वैष्णवांचा मेळा

सुनील आढाव

**पंढरीची वारी ही आनंदाची अनुभूती आहे. मानवी जीवनामध्ये प्रत्येक मनुष्यजीव हा परम सुखाच्या प्राप्ती आणि जीवनातून दुःखाच्या निवृत्तीसाठी सतत धडपडत असतो. परंतु, प्रत्येकाला ते प्राप्त होत नाही. खरा आनंद हा त्याग, समर्पण भावनेत व भगवंताच्या नामस्मरणात आहे, असे तत्त्व मानणारे वारकरी भगवंतांचे नाम घेत, वारीच्या मार्गाने पंढरीला**







उजळले भाग्य । आता अवघी चिंता वारली ॥
संत दर्शनी हा लाभ । पद्मनाभ जोडीला ॥
संपुष्ट हे हृदयपेटी । करूनी पोटी साठवू ॥
तुका म्हणे होता ठेवा । तो या भावा सापडला ॥

आपल्या भाग्याचा उदय वारीच्या मार्गामध्ये आहे, असे मानणारे हे सर्व वारकरी पंढरीच्या मार्गाने निघालेल्या प्रत्येक वारकऱ्याला वाटते. आपले जीवन समर्पित भावनेने जगताना त्यांना विठ्ठलाचा खूप मोठा आधार वाटतो. आपल्या वर्षभराच्या कामाचे नियोजन करून आषाढी देवशयनी एकादशीसाठी वारकरी वारीच्या मार्गाला लागलेला आहे. विठोबाच्या नावाचा गजर करीत मोठ्या आनंदाने पंढरपूरच्या मार्गाला नाचत-गात भगवंताला आपले क्षेम देण्यासाठी पोहोचला आहे.

अवघाची संसार सुखाचा करीन ।
आनंद भरीन तिन्ही लोक ॥

जाईन गे माय तया पंढरपुरा । भेटेल माहेरा आपुलिया ॥

ही वारी आनंदाची व्हावी यासाठी तो हरिनामात तल्लीन होऊन आपल्या संसाराची कोणतीही चिंता न वाहता त्यामध्ये समरस झाला आहे. वारकऱ्याला वारीचा हा संपन्न वारसा ज्यांच्यामुळे लाभला, त्या संतांची खूप मोठी परंपरा आपल्या देशाला लाभली आहे. त्यामध्ये महाराष्ट्रदेशीची संत मांदियाळीने निर्माण केलेली ही वारी संत ज्ञानेश्वरांनी दाखवून दिलेली आहे. हा मार्ग आज सर्व वारकरी निष्ठावान पांथस्थ म्हणून चालत आहेत. या वाटेचे वारकरी होताना गळ्यामध्ये तुळशी माळ आहे. मुखामध्ये विठ्ठलाचे नाम आहे. त्यांच्यासोबत संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत मुक्ताबाई, संत गजानन महाराज या सर्व संतांच्या दिंड्या वारकऱ्यांसह पंढरपूरला निघालेल्या आहेत. सर्व जणू आपल्या मुखातून एकच सांगत आहेतमाझे माहेर पंढरी । आहे भिवरीच्या तीरी ॥
भीमा आणि चंद्रभागा । तुझ्या चरणीच्या गंगा ॥

संतांनी दाखवलेल्या त्यागाचे प्रतीक असणारा वारीचा मार्ग त्यांनी आपल्या जीवनामध्ये स्वीकारला आहे. संत तुकारामांना तर, विठ्ठलाच्या भेटीची लागलेली आस त्यांनी अनेक अभंगातून व्यक्त केली आहे. ते म्हणतात -

भेटी लागी पंढरीनाथा । जीवा लागली तळमळ व्यथा ।
कै कृपा करिसी नेणे । मज दिनांचे धावणे ॥
शिणले माझे मन । वाट पाहता लोचन॥
तुका म्हणे भूक । तुझे पहावया मुख॥

तुकारामांना विठ्ठल भेटीची लागलेली ही आस त्यांनी व्यक्त केलेली आहे. देवा तुझा नाम चिंतनाची गोडी माझ्या जिवाला लागली आहे. तुझ्या दर्शनाची भूक डोळ्यांना लागली आहे. प्राण गेला तरी हा माझा भक्तिभाव बदलणार नाही. माझ्या वाणीमध्ये पांडुरंगाच्या भावाचे गुणगान आहे. माझी वाणी पांडुरंगाला समर्पित आहे. कारण पंढरीचा विठ्ठल हा आधी- मध्ये -अंती त्याच वाणीचा विसावा आहे. तुकारामांना पांडुरंगाच्या कृपाप्रसादाने त्यांच्या बुद्धीला वेदांच्या अभंगाचे झालेले स्फूरण आहे. याबद्दल विठ्ठलाचा कृपाप्रसाद आहे, असे ते मानतात. वेदातील कर्म-उपासना-ज्ञान या तत्त्वत्रयींसोबतच तत्त्वबोध, प्रमेय शास्त्रातील सिद्धांत आणि पुराणातील देवांचे अवतार कार्य या गोष्टी त्यांनी विठ्ठलाला साक्षी म्हणून अभंगामध्ये उद्धृत केले आहेत. तुकोबाची आविष्कार करण्याची पद्धती अशी आहे की, साक्षात विठ्ठल आपल्याशी बोलत आहे, असे वारकऱ्याला वाटते.

तुकोबा अभंगाच्या निमित्ताने आपल्याला आपल्याच जगण्याची कथा सांगत आहेत, असे प्रत्येक वारकऱ्याला वाटते. वारकऱ्यांचा धर्म ते सांगतात- विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ॥ जगाचे कल्याण व्हावे, सर्वांना शाश्वत सुख लाभावे, समाजात सर्वत्र दैवी संपत्ती नांदावी व सर्वांना अद्वैत बोध प्राप्त व्हावा आणि ईश्वर प्राप्ती होऊन सर्वांच्या आत्म्यास शांती लाभावी, ही विश्वकल्याणाची इच्छा संत तुकारामांनी आपल्या वारीच्या अभंगातून व्यक्त केली आहे. विठ्ठलाला ते म्हणतात-

अल्प माझी मती । म्हणूनी येतो काकुळती ॥
आता दाखवा दाखवा । तुमची पाउले केशवा ॥
धीर माझ्या मना। नाही नाही नारायणा॥
तुका म्हणे दया । मज करा अभगिया॥असे या विठ्ठलाला

आठवतात. तुकारामांना जीवनामध्ये निश्चिती प्राप्त होईल व मनाला समाधान वाटेल आणि वर्षभर तुझ्या रूपाचे ध्यान करेल. तुझ्यासाठी मी सर्वस्वाचा त्याग केला. तुला शरण आलो. पांडुरंगा. आता कोणत्याही भावाने माझा अंगीकार करावा. हीच त्यांच्या जीवाची तळमळ आपल्याला दिसते.

तुका म्हणे होईल दर्शने निश्चिती ।
गाईन ते गीत ध्यान मग ॥

लाखोंच्या संख्येने वारकरी पंढरपूरला निघालेले आहेत. ते याचसाठी की, आपल्या जीवनामध्ये आनंद निर्माण व्हावा. संतांनी सांगितलेली वारी ही केवळ वारी नसून प्रत्येक पावलागणीक त्या विठ्ठलाचे नाम घेतो म्हणजे पावलागणीक यज्ञ करण्याचे पुण्य त्यांना लाभते, असा समज वारकऱ्यांचा आहे. नाम घेताना ते आपले देहभान विसरून नाचत आहेत. ऊन्ह, पाऊस, थंडी, वाऱ्याचा कोणताही परिणाम त्यांच्या मनावर होत नाही. वारकरी जणू काही सर्वांना प्रेरणा देत आहेत की, कितीही संकटे आली तरी आपण आपल्या ध्येयासाठी म्हणजे आपल्या लाडक्या विठुरायाला भेटण्यासाठी चालत राहील तर, निश्चितच विठ्ठल आपल्याला भेटेल आणि आपल्या जीवनातील ध्येय प्राप्ती होईल. संसारामध्ये हा जीव त्रासून गेला आहे. त्याला खरी विश्रांती विठ्ठलाच्या चरणाजवळ प्राप्त होते. त्याला भेटल्यानंतर सर्व जीव निवतो. त्याला परमानंदाची प्राप्ती होते. जीवनामध्ये विविध भौतिक वस्तूंनी फक्त सुख प्राप्त होते. तर, विठ्ठलाच्या भजन आणि भक्तीने परम सुखाची प्राप्ती होते. जीवनातून दुःखाची निवृत्ती झाल्याचा भाव त्यांच्या चेहऱ्यावर प्रकट होतो. म्हणून आपली भावना व्यक्त करतो -

त्रासला हा जीव संसारीच्या सुखा ।
तुजविन सखा कोणी नाही ॥
असे माझे मनीं वाटे नारायणा।
घालावी चरणावरी मिठी ॥
ते सुंदर देखणे रुपडे आवडीचा कोंडे आलिंगीन।
नाही पूर्व पुण्य मज पामराशि ।
म्हणून मी पायाशी अंतरलो॥
अलभ्य लाभ कैसा संचिता वेगळा ।
विनवी गोपाळा दास तुका॥

भगवंताच्या दर्शनाने अलभ्य लाभ प्राप्त होतो. पूर्वजन्मीचे काही सुकृत माझ्या जीवनाचे काही संचित असेल म्हणून भगवंताने वारीसाठी बोलावले, असा भाव त्या प्रत्येक वारकऱ्यांच्या मनामध्ये आहे.

आर्त माझ्या बहु पोटी । व्हावी भेटी पायांची ॥
यासी तुम्ही कृपावंता। माझी चिंता असु द्या ॥
तळमळ करी चित्त। अखंडित वियोगे॥

# आकाशदीपने रूटला केलं क्लीन बोल्ड!

## दुसऱ्या डावात शुबमन गिलने उभारली विक्रमी धावसंख्या

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**इंग्लंडविरूद्ध दुसऱ्या कसोटी सामन्यात भारतीय संघाच्या खेळाडूंनी कमाल कामगिरी केली आहे. फलंदाजी, गोलंदाजी आणि फिल्डिंग तिन्ही विभागात खेळाडू आपलं योगदान देताना दिसत आहे. फलंदाजीत शुबमन गिलने विक्रमी धावसंख्या उभारली आहे, तर गोलंदाजी आकाशदीपने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. आकाशदीपने दुसऱ्या डावात बेन डकेट आणि जो रूट यांना क्लीन बोल्ड केलं. पण रूटला बाद करणं ही त्याची ड्रीम विकेट असणार आहे. या विकेटचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.**




जसप्रीत बुमराहच्या वर्कलोडमुळे बुमराह दुसऱ्या कसोटी सामन्यात खेळत नाहीये. त्यामुळे बुमराहच्या जागी आकाशदीपला दुसऱ्या सामन्यात संधी देण्यात आली आहे. आकाशदीपने भेदक गोलंदाजी करत बुमराहची फारशी उणीव भासू दिली नाही. आकाशदीपने पहिल्या डावात ४ विकेट्स घेतल्या. ज्यात ३०३ धावांची ब्रुक आणि स्मिथची भागीदारी तोडणारी विकेट महत्त्वाची होती. ज्यात त्याने ब्रुकला क्लीन बोल्ड केलं होतं.आकाशदीपने आता दुसऱ्या डावातही २ मोठ्या विकेट घेत इंग्लंडला धक्के दिले आहे. भारताने दुसऱ्या डावात ६ बाद ४२२ धावांवर डाव घोषित केला. ज्यामध्ये भारताला पहिल्या डावातील १८० धावांची आघाडी मिळाली होती. याचा अर्थ आता भारताकडे एकूण ६०७ धावांची मोठी भक्कम आघाडी आहे. तर इंग्लंडला विजयासाठी ६०८ धावा कराव्या लागणार आहेत. पण इंग्लडने चौथ्या दिवशीच तीन मोठे विकेट गमावले आहेत.

इंग्लंडने जॅक क्रॉली, बेन डकेट आणि जो रूट यांच्या रूपात ३ विकेट्स गमावल्या. आकाशदीपने डकेट आणि रूटला क्लीन बोल्ड केलं. ज्यापैकी जो रूटची विकेट कमालीची होती. त्याचा चेंडू पाहून सगळेच चकित झाले होते. रूटला बाद करणं म्हणजे निम्मा इंग्लंडचा संघ बाद करण्यासारखं आहे. जो रूट हा कसोटी क्रिकेटमधील सध्याचा वर्ल्ड नंबर वन फलंदाज आहे. त्याची विकेट ही आकाशदीपसाठी नक्कीच ड्रीम विकेट होती.जो रूट आकाशदीपच्या ११व्या षटकात बाद झाला.

आकाशदीपने क्रीजच्या वाईड चेंडू टाकला, चेंडू पडल्यानंतर कमालीचा अँगल तयार झाला. रूटने बॅटचा फेस क्लोज केला आणि चेंडू खेळण्यासाठी पुढे गेला. तितक्यात त्याच्या बॅटची कड घेत चेंडू जाऊन ऑफ स्टम्पवर आदळला आणि रूट क्षणात क्लीन बोल्ड झाला. रूट विकेटकडे न बघताच निघून गेला. आकाशदीपचा कमालीचा चेंडू पाहून टीम इंडियाचे खेळाडूही चकित झाले. पंतने चकित झाल्याचे हावभाव दिले. तर कर्णधार गिलने थेट डोक्यावरच हात ठेवले. आकाशदीपच्या या विकेटचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.इंग्लंडने चौथ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत १६ षटकांत ३ बाद ७२ धावा केल्या. यासह इंग्लंडला विजयासाठी आता ५३६ धावांची गरज आहे. इंग्लंडकडून आता मैदानावर हॅरी ब्रुक १५ नाबाद धावा आणि ऑली पोप २४ नाबाद धावा करत कायम आहेत. भारताला विजयासाठी ७ विकेट्सची गरज आहे. लोडमुळे बुमराह दुसऱ्या कसोटी सामन्यात खेळत नाहीये. त्यामुळे बुमराहच्या जागी आकाशदीपला दुसऱ्या सामन्यात संधी देण्यात आली आहे. आकाशदीपने भेदक गोलंदाजी करत बुमराहची फारशी उणीव भासू दिली नाही.

### पहिल्या डावात 4 विकेट्स घेतल्या

आकाशदीपने पहिल्या डावात ४ विकेट्स घेतल्या. ज्यात ३०३ धावांची ब्रुक आणि स्मिथची भागीदारी तोडणारी विकेट महत्त्वाची होती. ज्यात त्याने ब्रुकला क्लीन बोल्ड केलं होतं.आकाशदीपने आता दुसऱ्या डावातही २ मोठ्या विकेट घेत इंग्लंडला धक्के दिले आहे. भारताने दुसऱ्या डावात ६ बाद ४२२ धावांवर डाव घोषित केला. ज्यामध्ये भारताला पहिल्या डावातील १८० धावांची आघाडी मिळाली होती. याचा अर्थ आता भारताकडे एकूण ६०७ धावांची मोठी भक्कम आघाडी आहे. तर इंग्लंडला विजयासाठी ६०८ धावा कराव्या लागणार आहेत. पण इंग्लडने चौथ्या दिवशीच तीन मोठे विकेट गमावले आहेत.इंग्लंडने जॅक क्रॉली, बेन डकेट आणि जो रूट यांच्या रूपात ३ विकेट्स गमावल्या. आकाशदीपने डकेट आणि रूटला क्लीन बोल्ड केलं. ज्यापैकी जो रूटची विकेट कमालीची होती. त्याचा चेंडू पाहून सगळेच चकित झाले होते.

# शुबमन गिलने रेकॉर्ड्सचा पाऊस पाडला!

## 150 वर्षांत कोणालाच न जमलेला 'हा' रेकॉर्ड 39 धावांनी हुकला

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील दुसरा कसोटी सामना बर्मिंघमच्या मैदानावर सुरू आहे. या सामन्यात भारतीय फलंदाजांचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. या सामन्यातील दुसऱ्या डावात भारतीय संघाने ४२७ धावा करत डाव घोषित केला आहे.**




यासह भारतीय संघाने इंग्लंडला जिंकण्यासाठी ६०८ धावांचं मोठं आव्हान दिलं आहे. भारतीय संघाकडून कर्णधार शुबमन गिलने पहिल्या डावात २६९ धावांची खेळी केली. तर दुसऱ्या डावात फलंदाजी करताना त्याने १६१ धावांची खेळी केली. यादरम्यान त्याच्या नावे मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली. तर २ मोठे रेकॉर्ड करण्याची संधी त्याने गमावली आहे.भारतीय संघाचा कर्णधार शुबमन गिलने या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना २६९ धावांची दमदार खेळी केली. या डावात त्याला त्रिशतकी खेळी करण्याची संधी होती. पण तो बाद होऊन माघारी परतला. त्यानंतर दुसऱ्या डावात फलंदाजी करतानाही त्याने इंग्लंडच्या फलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. दुसऱ्या डावात त्याने १६१ धावांची खेळी केली. यासह त्याने दोन्ही डावात मिळून ४०० धावा केल्या आहेत. यासह तो कसोटी क्रिकेटमध्ये ४०० धावा करणारा पहिलाच भारतीय फलंदाज ठरला आहे. याआधी कुठल्याही भारतीय फलंदाजाला एकाच कसोटी सामन्यात ४०० धावा करता आलेल्या नाहीत. याआधी एकाच कसोटी सामन्यात सर्वाधिक धावा करण्याचा रेकॉर्ड हा सुनील गावसकरांच्या नावे होता. हा रेकॉर्ड आता शुबमन गिलच्या नावे आहे. हा रेकॉर्ड मोडणं मुळीच सोपं नसणार आहे.या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना गिलने २६९ धावांची खेळी केली. पहिल्या डावात द्विशतकी खेळी केल्यानंतर त्याच्याकडे दुसऱ्या डावातही द्विशतकी खेळी करण्याची संधी होती. याआधी कसोटी क्रिकेटच्या इतिहासात असं कधीच घडलेलं नाही. जर गिलने अजून ३९ धावा केल्या असत्या, तर कसोटी क्रिकेटमधील दोन्ही डावात द्विशतकं झळकावणारा तो जगातील पहिलाच फलंदाज ठरला असता. मात्र हा मोठा रेकॉर्ड थोडक्यात हुकला.

### मोठे रेकॉर्ड मोडण्याची संधी हुकली

गिलकडे एकाच कसोटी सामन्यात सर्वाधिक धावा करण्याचा रेकॉर्ड आपल्या नावावर करण्याी संधी होती. शुबमन गिलने या डावात फलंदाजी करताना ४३० धावा केल्या आहेत. ग्रामह गुच यांनी १९९० मध्ये लॉर्ड्सच्या मैदानावर ४५६ धावा केल्या होत्या. आता गिल सर्वाधिक धावा करणारा दुसरा फलंदाज ठरला आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार ।
। दि. 6 जुलै 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



DYP
DR. D. Y. PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE


# Dr D Y Patil Educational Complex, Akurdi, Pune

*Approved by AICTE, DTE, MSBTE & Govt. of Maharashtra,*
*Accredited by NBA & Grade Status by NAAC, Affiliated to Savitribai Phule Pune University*

41 YEARS Academic Excellence

**ADMISSIONS OPEN 2025-26**

## Experience D Y Patil Educational Complex



- **15k+** Students Placed
- **52 LPA** Highest Package
- **50,000+** Alumni
- **1000+** Empanelled Recruiters
- **150+** University Toppers

## Our Institutes

### D Y Patil College of Engineering (Autonomous)

***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Accredited by NAAC with 'A' Grade & NBA
*UG – Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A*
*PG – Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A*
*PhD – Mech / E&TC / Civil*

### D Y Patil Institute of MCA & Management

Accredited by NAAC with 'A' Grade & Affiliated to SPPU
*MCA / MBA / PhD (Management)*

### Dr D Y Patil College of Architecture

Accredited by NAAC with 'A' Grade & Approved by COA
*B Arch / M Arch (Construction Management) / D Arch*

### D Y Patil PGDM Institute, Akurdi, Pune

***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
*Specializations: Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management*

### Dr D Y Patil College of Agriculture Business Management

Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
*BSc (Hons) Agri Business Management*

### Dr D Y Patil College of Pharmacy

Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
Accredited by NBA & NAAC with 'A+' GRADE
*D Pharm / B Pharm / Pharm D / M Pharm (Phcol) / M Pharm (Pharmaceutics) / M Pharm (DRA) / M Pharm (PQA) / M Pharm (Pchem) / M Pharm (PP) / PhD*

### Dr D Y Patil Institute of Pharmacy

Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
*D Pharm*

### Y B Patil Polytechnic

Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
*Diploma in Civil / Mech / Comp / E&C (Accredited by NBA)*

## Campus at a Glance

- Beautifully landscaped lush green campus
- Virtual Lab Nodal Centre of IIT Bombay
- Digital Classrooms & Libraries
- Online Teaching Learning Platforms
- Highly Qualified & Experienced Faculty
- Outstanding academic results
- Collaboration with International Universities
- Wi-Fi enabled campus / ERP Enabled Administration
- Extravagant Cafeterias & Sports Complex
- Ultra-modern Auditoriums, Seminar Halls
- Conducive & disciplined environment
- Incubation & Startup ecosystem
- State-of-the-Art Hostel for Girls & Boys

## Corporate Relations & Placement Cell


- Strong Alumni engagement
- Internship Opportunities in Industry
- Industry-Centric Training Programs
- International Placement Opportunities
- Notable Placement Record
- Employability Assessment Test conducted by SHL for students (First year to Final Year)
- Corporate Tie-ups & Partnerships with industry for student enrichment activities
- Participation of students in Hackathons & competitions organized by Industries
- Thrust on Personality Development, Soft Skills & Communication Skills in English in Language Laboratories

## Collaborations with Industry (MOU's & COE's)

SECTOR NO. 29, NIGDI PRADHIKARAN, AKURDI, PUNE 411044, MAHARASHTRA, INDIA
www.dypakurdipune.edu.in admission@dypakurdipune.edu.in @dypakurdipune
9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999

REGISTER HERE

**"Discover, Learn, Lead—The D Y Patil Way."**


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Not just education, but
Personality
transformation.
ADMISSIONS OPEN for 2025-26
• CBSE curriculum
• Initiatives like 'Read-to-Lead'
• Tradition of 100% result
Gayatri English Medium School & Junior College, Charholi
95277 64646 / 77967 67292


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046